**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १७५/२०१० मधील निशाण क्र.१५३ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र.२ लक्ष्मण कोंडीबा पवार यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणेसाठी परवानगीचा तसेच तदअनुषंगिक दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन असे की, प्रस्तुतचा प्रतिदावा वादीने प्रतिवादी यांचे विरोधात जाहीर ठराव होवून मिळणेकामी दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.२ लक्ष्मण कोंडीबा पवार हे दि.०३.०८.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.२ च्या मुत्यू पश्च्यात सदर प्रतिवादीस अर्जात नमूद केल्याप्रमाणे २अ, २ब, २क व २ड हे कायदेशीर वारस असून त्यांना रेकॉर्डवर घेणे गरजेचे झालेले आहे. सदर नमुद वारसां व्यतिरीक्त मयत प्रतिवादी क्र.२ यांना अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ च्या वारसांचे नावे अभिलेखावर समाविष्ट करणेस परवानगी मिळणेसाठी तसेच इतर न्यायाचे आदेश करण्यात यावेत अशी विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ ने म्हणणे सादर करुन असे कथन केले की, सदर अर्ज खरा व कायदेशीर नाही. कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करणेत यावेत अशी विनंती केली आहे.

०४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा प्रतिदावा वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ लक्ष्मण कोंडीबा पवार हे दि.०३.०८.२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्या पुष्ठ्यर्थ मयत प्रतिवादी क्र.२ यांचा मुत्यूचा दाखला नि.क्र.१३२ सोबत अभिलेखावर सादर केला आहे. अर्जदार वादीचे असे कथन आहे की, मयत प्रतिवादीस अर्जात नमूद २अ ते २ड असे कायदेशीर वारस असून त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ

अर्जदाराने त्याचे शपथपत्र नि.क्र.१५४ वर दाखल केलेले आहे. सदर प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ मयत झाल्यामुळे व सदरचा दावा हा स्थावर मिळकती संदर्भातील असल्यामुळे सदर मयत प्रतिवादीच्या वारसांना दावा मिळकती संदर्भात हक्क असल्याने दावा पुढे चालविण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे सदर प्रकरणांचा न्यायानिर्णय गुणदोषाच्या कसोटीवर करण्यासाठी गरजेचे आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासाठी व तद्अनुषंगीक दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देणे न्यायोचित ठरेल. सबब, वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाण क्र.१५३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस व त्यानुसार तद्अनुषंगीक दुरुस्ती प्रतिदाव्याच्या सरनाम्यामध्ये करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2024.12.13 11:04:24 +0530

दिनांक – १२/१२/२०२४.

(एस.एस. साळुखे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.